# नेहमी विचारले जाणारे प्रश्न

**सामान्य:**

### १) किसान रथ मोबाइल अ ॅप म्हणजे काय?

किसान रथ मोबाइल अ ॅप एकाधिक (एक किंवा एकापेक्षा जास्त) व्यापारी किंवा ट्रान्सपोर्टर्सकडून प्रतिसाद मिळविण्याकरिता कृषी उत्पादनासाठी खरेदीदार, विक्रेते किंवा परिवहन प्रदात्यांचा शोध घेत आहेत अशा शेतकरी, एफपीओ आणि व्यापाऱ्यांसाठी आहे.

### २) किसान रथ मोबाईल अ ॅपचा उपयोग कोण करू शकतो?

शेतकरी / एफपीओ कृषि उत्पादनाच्या विक्री किंवा वाहतुकीसाठी विनंती पाठवू शकतात. ट्रक किंवा ट्रॅक्टर ट्रॉली मालक कृषि उत्पादनाच्या वाहतुकीसाठी सेवा प्रदाता म्हणून नोंदणी करू शकतात. व्यापारी कृषि उत्पादने खरेदी किंवा वाहतुकीची मागणी पाठवू शकतात.

### 3) मी किस ान रथ मोबाइल अ ॅप कोठून डाउनलोड करू शकतो?

अँड्रॉइड वापरकर्त्यांसाठी गूगल प्ले स्टोअर व आयओएस वापरकर्त्यांसाठी ॲपलच्या ॲप स्टोअर वरून “किसान रथ” ॲप शोधून डाऊनलोड करता येते. 16 जीबी अंतर्गत स्टोरेज स्पेससह किमान 2 जीबी रॅम आवश्यक आहे. अधिक रॅम असल्यास जास्त सहजतेने वापरता येते. असा वापरकर्त्याचा अनुभव आहे. ऑपरेटिंग सिस्टम 5.0 किंवा त्यापुढील आवश्यक आहे.

### 4) अ ॅपच्या कामकाजासाठी इंटरनेट आवश्यक आहे का?

होय, ॲपच्या कार्यासाठी मोबाइल इंटरनेट कनेक्शन आवश्यक आहे.

### 5) अ ॅप बहुभाषिक आहे?

होय, हे बहुभाषिक आहे. शिर्षक सुरवातीस निवडलेल्या भाषेमध्ये असतील परंतु निवडलेल्या कीबोर्डनुसार इनपुट असेल.

### 6) अ ॅप संबंधित कोणत्याही समस्येसाठी मी कोणाशी संपर्क साधू शकतो?

ट्रक ड्रायव्हर्स, व्यापारी, किरकोळ विक्रेते, ट्रान्सपोर्टर किंवा इतर कोणत्याही भागधारक ज्यांना वरील वस्तूंच्या आंतरराज्यीय हालचालीत समस्या येत आहेत, त्यांनी खाली नमूद केलेल्या क्रमांकावर संपर्क साधून मदत मागू शकता. कॉल सेंटरचे कार्यकारी अधिकारी आवश्यक असलेल्या मदतीसह वाहन व मालाचा तपशील राज्य सरकारकडे पाठवतील. समस्यांचे निराकरण करण्यासाठी खालील अधिकाऱ्यांशी संपर्क करावा -

अ) **केंद्रीयस्तरीय आंतरराज्यीय परिवहन समन्वय नियंत्रण कक्ष**
(विपणन व तपासणी संचालनालय, फरीदाबाद)

- श्री एम. थंगराज, संयुक्त कृषि विपणन सल्लागार. (नोडल अधिकारी) - 8373929137
- श्री मधुर वर्मा, एसएमओ (डीएमआय) - 9549382070
- ईमेल: jtama-dmi@gov.in

ब) **किसान रथ मदत कक्ष**

आपण किसान रथ मदत कक्ष (किसान कॉल सेंटर) 1800 180 1551 वर किंवा प्रशासकीय समस्यांसाठी kisanrath-agri@gov.in या ईमेलवर आणि तांत्रिक अडचणींसाठी kisanrath-tech@nic.in वर ईमेल करू शकता.

वरील फोननंबर कोणत्याही मोबाइल किंवा लँडलाईन फोनवरून कॉल करु शकता.

**नोंदणी व लॉगिन-**

**7) या ॲपवर कोण नोंदणी करू शकेल?**

शेतकरी, व्यापारी, एफपीओ (शेतकरी उत्पादक संस्था) आणि वाहतुकदार नोंदणी करू शकतात.

**8) ओटीपी आवश्यक आहे का?**

होय, नोंदणीच्या वेळी आपण दिलेल्या मोबाइल नंबरवर प्राप्त झालेला ६ अंकी ओटीपी आवश्यक आहे. ओटीपी प्राप्त न झाल्यास, तो पुन्हा पाठविण्यासाठी वापरकर्ता पर्याय निवडू शकतो. तसेच, आपल्या भागात नेटवर्क कनेक्शन उपलब्ध असल्याची खात्री करावी.

**9) एकाच मोबाइल नंबरवरून अनेक नोंदणी करण्यास परवानगी आहे का?**

होय, भिन्न श्रेणींमध्ये (उदा. शेतकरी, व्यापारी, एफपीओ आणि सेवा प्रदाता) एका मोबाइल क्रमांकासाठी एक किंवा एकापेक्षा जास्त नोंदणीस परवानगी आहे, तथापि, एकाच श्रेणी अंतर्गत एक मोबाइल नंबर फक्त एकदाच नोंदणी करण्यासाठी वापरला जाऊ शकतो.

**१०) आपला जिल्हा / उपजिल्हा / गट / गाव ड्रॉपडाऊन यादीमध्ये दिसत नसेल तर?**

कृपया क्षेत्राच्या तपशीलासह kisanrath-tech@nic.in या ईमेल वर मेल पाठवा.

**११) मला माझा यूजर आयडी व पासवर्ड कोठून मिळेल?**

यूजर आयडी तुमच्या मोबाइल नंबर सारखाच असेल. यशस्वी नोंदणीनंतर पासवर्ड तुम्हाला पाठविला जाईल.

**12) एखादा वापरकर्ता त्याचा पासवर्ड विसरला तर?**

वापरकर्ता विसरलेला पासवर्ड (Forget Password) या लिंकवर क्लिक करू शकतो आणि मोबाइल नंबरचा वापर करून पासवर्ड रीसेट करू शकतो.

**13) शेतक-यांसाठी आधार क्रमांक अनिवार्य आहे काय ?**

पी.एम.किसान सन्मान निधी योजनेत आधीच नोंदणीकृत असलेल्या शेतक-यांसाठी आधार क्रमांक अनिवार्य आहे.

**14) सेवा प्रदात्याच्या नोंदणी अर्जात स्टेट ऑफ ऑपरेशन्स म्हणजे काय?**

सेवा प्रदात्यांद्वारे माल पाठविण्याचे स्त्रोत आणि गंतव्य स्थानासह राज्यांसह लोड करण्यात आलेल्या विनंत्या प्राप्त केल्या जातील.

**15) अॅपमध्ये लॉगिनचे कोणत्या पध्दती दिल्या आहेत?**

वापरकर्त्यांच्या सोयीसाठी सध्या लॉगिनच्या दोन पध्दती दिलेल्या आहेत जसे की ओटीपी आधारित लॉगिन आणि पासवर्ड आधारित लॉगिन.

**लोड पोस्ट करणे:**

**16) मी एकाच वेळी एक किंवा एकापेक्षा जास्त लोड पोस्ट करू शकतो का?**

होय, आपण एका वेळी एक किंवा एकापेक्षा जास्त लोड पोस्ट करू शकता. आपणास प्रत्येक लोडसाठी स्वतंत्रपणे सूचना मिळतील.

**17) मी विशिष्ट कालावधीसाठी वाहन भाड्याने देऊ शकतो का?**

नाही. केवळ स्त्रोत स्थानापासुन गंतव्यस्थानापर्यंतच्या वाहतुकीसाठी वाहन भाड्याने घेतले जाऊ शकते.

**१8) मंत्रालयाकडून दर निश्चित केले जातात काय?**

नाही. दर वाहतुकदाराने दिले आहेत. मंत्रालय किंवा अनुप्रयोग प्रदाता दर निश्चित करण्यात कोणतीही भूमिका निभावत नाहीत. हे अॅप हे शेतकरी, व्यापारी आणि एफपीओ यांना वाहतूकदारांशी जोडण्याचे एक साधन आहे.

**19) वाहतूकदारांकडून प्रदान केलेले दर वाटाघाटी करता येतात काय?**

शेतकरी / व्यापारी / एफपीओ दर थेट वाहतूकदारांशी बोलू शकतात. मंत्रालय किंवा अनुप्रयोग प्रदाता वाटाघाटीमध्ये किंवा त्याच्या निर्णयामध्ये कोणतीही भूमिका घेत नाहीत.

**20) मी बुकिंग रद्द करू शकतो का? आगाऊ पैसे परत कसे मिळतील?**

बुकिंगच्या वेळी शेतकरी / व्यापारी / एफपीओ आणि वाहतूकदार यांच्यात झालेल्या अटी व शर्तींच्या अनुषंगाने हे बुकिंग रद्द केले जाऊ शकते. कोणत्याही आगाऊ देयकाचा परतावा देखील त्याच अटी आणि शर्तींच्या अधीन आहे. मंत्रालय किंवा अनुप्रयोग प्रदात्याची यात कोणतीही भूमिका नाही.

**21) मी या पोर्टलद्वारे ऑनलाईन पेमेंट करू शकतो का?**

नाही. सध्या पेमेंट थेट वाहतूकदारांना केले जाणार आहे.

**२२) या अॅपद्वारे वाहन बुकिंगसाठी शासनाकडून काही अनुदान किंवा इतर लाभ दिले जातात का?**

नाही. या अॅपद्वारे वाहन बुकिंगसाठी शासन कोणतेही अनुदान किंवा इतर लाभ देत नाही.

**२3) या अॅपद्वारे वाहन बुकिंगसाठी व्यापा-यांना शासनाने कोणताही कर, लाभ किंवा सूट दिली आहे का?**

नाही. शासन या अॅपद्वारे वाहन बुकिंगसाठी कोणताही कर, लाभ किंवा सूट देत नाही.

**२4) जर मला यापुढे किसान रथ अॅपद्वारे माझी वस्तू एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी नेण्याची इच्छा नसेल तर मी एक पोस्ट केलेली लोड विनंती रद्द करू शकतो?**

होय, "विनंती रद्द" (Cancel Request) या टॅबवर क्लिक करावे.

**२5) किसान रथ अॅपद्वारे माझी वस्तू एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी नेण्यासाठी एखादे योग्य वाहतुकदार सापडल्यास पोस्ट केलेली लोड विनंती बंद करता येईल काय?**

होय,  "सेवा उपलब्ध" (Service Availed) या टॅबवर क्लिक करावे.

**ॲग्रिगेटर ऑनबोर्डिंग:**

**26) या प्लॅटफॉर्मवर वाहतुकदार कसे नोंदविता येतील?**

या प्लॅटफॉर्मवर नोंदणी करण्याची इच्छा असणारा कोणताही वाहतूकदार व्यक्ती/संख्या ऑनबोर्डिंगची प्रक्रिया समजण्यासाठी kisanrath-agri@gov.in वर मेल पाठवू शकतो किंवा नोंदणीची प्रक्रिया समजण्यासाठी व्हिडीओ पाहु शकता.

**अभिप्राय आणि रेटिंग:**

**27) वाहतुकादाराद्वारे प्रदान केलेल्या सेवांसाठी रेटिंग कोण पुरवू शकेल?**

कोणताही शेतकरी, व्यापारी किंवा एफपीओ ज्याने वाहतुकीचे वाहन भाड्याने घेतले आहे, तो वाहतुक पूर्ण झाल्यावर त्या वाहतूकदारास रेटिंग देऊ शकतो.

**पासवर्ड बदला:**

**28) मी ओटीपी आधारित लॉगिन पध्दतीचा वापर करुन लॉगिन करतो तेव्हा पासवर्ड बदला पर्याय पाहू शकत नाही?**

पासवर्ड आधारित लॉगिन पध्दतीद्वारे लॉगिन करून वापरकर्त्याद्वारे पासवर्ड बदलला जाऊ शकतो. ओटीपी आधारित लॉगिन पध्दतीमध्ये लॉगिन करून पासवर्ड बदला या पर्यायाचा उपयोग केला जाऊ शकत नाही.

**फळे आणि भाज्या - खरेदी आणि विक्री मोडयुल (एफ आणि व्ही मोड्यूल):**

**29) मी किसान रथ अॅपवर फळ आणि भाजीपाला विक्री व खरेदीची विनंती पोस्ट करू शकतो का?**

होय, शेतकरी / एफपीओ फळ आणि भाजीपाला विक्री विनंती पोस्ट करू शकतो. त्याचप्रमाणे, शेतकरी किसान रथ अॅपवर फळे आणि भाजीपाला खरेदी करण्याची विनंती पोस्ट करू शकतो.

**30) फळे व भाजीपाला विभागातील विविध वस्तूंच्या विक्री / खरेदीसाठी कोणत्या किंमती आहेत?**

विविध वस्तूंच्या किंमती उत्पादनांच्या विविधता आणि गुणवत्तेवर अवलंबून असतात आणि म्हणूनच किसान रथ ॲपद्वारे किंमती ठरविलेल्या नाहीत. खरेदीदार आणि विक्रेता थेट वाटाघाटी करू शकतात आणि योग्य किंमतीवर सहमत होऊ शकतात. किसान रथ अॅप केवळ खरेदीदार आणि विक्रेते यांना जोडण्यास मदत करते.

**31) मी किसान रथ ॲपवर विक्रीसाठी असलेल्या वस्तूंची यादी केली तर ती थेट बाजारातही विक्री करता येईल का?**

होय, किसान रथ अॅप सुचीबध्द वस्तुंची केवळ अॅपद्वारेच विक्री करणे सक्तीचे करत नाही. खुल्या बाजारातून तुम्हाला चांगली किंमत मिळत असल्यास, ती थेट विकण्यास तुम्हाला स्वातंत्र्य आहे.

**32) मी एक व्यापारी आहे. मला आवश्यक असलेल्या कोणत्याही वस्तूंसाठी मी खरेदी विनंती करू शकतो का ?**

होय, कृपया किसान रथ ॲपमधील "खरेदीची विनंती पोस्ट करा" वर जा. तेथे आपण आपल्या इच्छित वस्तूंचा तपशील भरू शकता आणि सबमिट करू शकता. इच्छुक शेतकरी / एफपीओ नंतर त्यांच्या ऑफरसह आपल्याला प्रतिसाद देतील.

**33) मी या पोर्टलवर ऑनलाइन पेमेंट करू शकतो?**

नाही. सध्या पेमेंट थेट विक्रेत्यास दिले जावे.

**34) मी विक्री / खरेदी ऑर्डर रद्द करू शकतो? आगाऊ पैसे परत कसे मिळतील?**

ऑर्डरच्या वेळी खरेदीदार आणि विक्रेता यांच्यात झालेल्या अटी व शर्तींच्या अधीन विक्री / खरेदी ऑर्डर रद्द केली जाऊ शकते. कोणत्याही आगाऊ देयकाचा परतावा देखील त्याच अटी आणि शर्तींच्या अधीन आहे. मंत्रालय किंवा अनुप्रयोग प्रदात्याची यात कोणतीही भूमिका नाही.

**35) मी एक शेतकरी / एफपीओ आहे. या ॲपवरील "खरेदी विनंत्या प्राप्त करा" मेनू अंतर्गत कोणत्या वस्तूंच्या खरेदी विनंत्या (व्यापा-यांनी उपस्थित केल्या आहेत) मला सूचित केल्या जातील?**

नोंदणी दरम्यान आपण आपल्या प्रोफाईलमध्ये निवडलेल्या त्या वस्तूंच्या खरेदी विनंत्या आपल्याला प्राप्त होतील. आपण प्रोफाइल विभागात जा आणि आवश्यक वस्तू निवडल्यानंतर प्रोफाइल अदययावत करून आपल्या प्रोफाइलमधून वस्तू जोडू / काढू शकता.

**36) मला यापुढे किसान रथ अॅपद्वारे फळे व भाजीपाला विक्री करायची नसेल तर मी पोस्ट केलेली फळे व भाजीपाला विक्री विनंती रद्द करू शकतो का?**

होय, "विनंती रद्द " (Cancel Request) या टॅबवर क्लिक करावे.

**37) किसान रथ अॅपद्वारे माझ्या फळे व भाजीपालासाठी योग्य खरेदीदार आढळल्यास मी पोस्ट केलेली फळे व भाजीपालासाठी विक्री विनंती बंद करू शकतो का?**

होय, "सेवा उपलब्ध" (Service Availed) या टॅबवर क्लिक करावे.

**38) मी यापुढे किसान रथ अॅपद्वारे खरेदी करू इच्छित नसल्यास मी पोस्ट केलेली एफ आणि व्ही खरेदीची विनंती रद्द करू शकतो का?**

होय, "विनंती रद्द " (Cancel Request) या टॅबवर क्लिक करावे.

**39) किसान रथ अॅपद्वारे मला योग्य विक्रेता सापडल्यास मी एक पोस्ट केलेली एफ आणि व्ही विकतची विनंती बंद करू शकतो का?**

होय, "सेवा उपलब्ध" (Service Availed) या टॅबवर क्लिक करावे.

**ईएनएएम वापरकर्ते:**

**40) मी आधीपासूनच ईएनएएम वर नोंदणीकृत आहे. मला किसान रथवर पुन्हा नोंदणी करण्याची गरज आहे का?**

तुम्हाला किसान रथवर पुन्हा नोंदणी करण्याची गरज नाही. कृपया ईएनएएम वर नोंदणीकृत असलेल्या त्याच मोबाइल क्रमांकासह लॉगिन करा. लॉगिननंतर आपल्याला काही तपशील भरण्यास सांगितले जाईल आणि त्यानंतर आपण किसान रथ वापरण्यास सुरूवात करू शकता. ईएनएएम ट्रेडर्स / एफपीओ विसरला पासवर्ड पर्यायावर क्लिक करुन त्यांचा पासवर्ड पुनर्प्राप्त करू शकतात.

**41) मी ईएनएएम वर पोस्ट लोड विनंती तयार केली आहे. मला आता काय करण्याची गरज आहे?**

आपल्याला किसान रथवर लॉग इन करून "लोड विनंती यादी" वर जाण्याची गरज आहे. "एनम पोस्ट लोड विनंती" निवडा आणि उर्वरित तपशील पूर्ण करण्यासाठी "नेक्स्ट" वर क्लिक करा आणि शेवटी विनंती सबमिट करा.

**42) मी ईएनएएम वर पोस्ट लोड विनंती तयार केली आहे, परंतु माझ्याकडे आधीपासूनच वाहतुकीची उपलब्धता आहे आणि किसान रथकडून वाहतुकीची आवश्यकता नाही. मला आता काय करण्याची गरज आहे?**

आपल्याला काहीही करण्याची आवश्यकता नाही. एकदा आपण किसान रथ अॅपवर लॉग इन करून विनंती सबमिट केल्यावर पोस्ट लोड विनंती फक्त ट्रान्सपोर्टर्सलाच दिली जाईल.